# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 24 March 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २४ मार्च २०२५ दुपारी १.०० वा.**

****

औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा काढण्याची गरज नाही, कोणीही बोलतांना विचार करून बोलले पाहिजे, असं मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. कायदा आणि सुव्यवस्था बिघडून पोलिसांवर जास्त ताण येईल, असं कोणीही बोलू नये, असं ते म्हणाले.

तत्पूर्वी पवार यांनी, ज्येष्ठ साहित्यिक दिवंगत रा.रं. बोराडे तसंच मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी महासचिव मधुकरअण्णा मुळे यांच्या परिवारांची सांत्वनपर भेट घेतली.

****

२० पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या शाळा बंद करण्याचं राज्य सरकारचं धोरण नाही, तसा शासन निर्णय निर्गमित केलेला नाही, असं राज्य सरकारने आज विधानसभेत स्पष्ट केलं. राज्यातल्या शाळांमध्ये पायाभूत सुविधा आणि आवश्यक गोष्टी उपलब्ध करून देण्यासाठी शाळा दत्तक योजना राबवली जात आहे. त्यात दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कंपन्यांकडून आर्थिक मदत घेतली जाते. त्यामुळे १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद तसंच मराठी शाळा बंद होण्याचा प्रश्न नसल्याचं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी लेखी उत्तरात सांगितलं.

राज्यातल्या शाळा दुरुस्तीचा आराखडा लवकरच तयार करू आणि त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करू असं आश्वासन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिलं.

****

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वारकरी संप्रदायातला मानाचा आद्य जगतगुरु श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री